दै. सत्यप्रभा दि. ०६/०६/२४

# वाटसरूला लूटणाऱ्या दोन दरोडेखोरांना अटक



**हिमायतनगर, दि. ५ :** राष्ट्रीय महामार्ग व ग्रामीण भागातील रस्त्यावर वाटसरूंचे मोबाईल पैसे लुटणाऱ्या दरोडेखोराना हिमायतनगर पोलिसांनी दोन मोबाईल, दुचाकी व नगदी रक्कम मुद्देमालासह रंगेहाथ पकडले आहे.

हिमायतनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि. १८ मे रोजी फिर्यादीच्या जबाबवरून पोलिस स्थानकात कलम ३९२, ३४१, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार दि. ०१ जून रोजी हिमायतनगर येथे चाकुचा धाक दाखवुन मोटार सायकल आडवून मोबाईल व पैसे जबरीने पळविल्याची गुप्त माहिती मिळाल्यावरून पो. नि. शरद जऱ्हाड यांचे मार्गदर्शनाखाली तपासिक अधिकारी व कर्मचारी यांनी दरोड्यातील दोन चोरांना मुदखेड येथून मोठ्या शिताफीने अटक केली.

यावेळी दोन्ही आरोपींना पो.स्टे हिमायतनगरला आणून विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्ह्याची कबुली दिली. तसेच त्यांनी त्यांच्या इतर ०४ साथीदारांची माहिती देऊन त्यांनी संगनमताने गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यावरून सदर गुन्हयात कलम ३९५ भादंविची वाढ करण्यात आली आहे. पोलिसांनी अधिक तपास केला असता आरोपींनी एकूण ३ मोबाईल तसेच रोख रक्कम ३,८००/-रु. पोलिसांच्या स्वाधिन केले.

या घटनेचा तपास पोनि शरद जऱ्हाड यांचे मार्गदर्शनाखाली मपोउपनि निता कदम, पोलीस अंमलदार मसपोउपनि कागणे, पोहवा नागरगोजे, पोहवा पाटील, चौदंते, महिला पोलिस कर्मचारी पवार यांनी केला.

दै. सत्यप्रभा.

# दीड लाखांचे १३ मोबाईल जप्त; आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**नांदेड, दि. ५ :** संशयावरून पकडलेल्या एका चोरट्याकडून १ लाख ३४ हजार रुपये किमतीचे चोरीचे १३ मोबाईल जप्त करण्याची कामगिरी वजिराबाद पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने मंगळवारी ( दि.४) केली आहे.

शहरातील बसस्थानक ते रेल्वेस्थानक परिसरात गेल्या काही दिवसांपासून लुटमार आणि मोबाईल चोरीच्या घटना घडल्या असल्याच्या पार्श्वभूमीवर वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे अधिकारी सपोनि आर.डी. वटाणे, पोहेकॉ.दत्तराम जाधव, पोहेकॉ. मनोज परदेशी, पोना.शरदचंद्र चावरे, पोकॉ शेख ईम्रान शेख एजाज, पोकॉ. बालाजी कदम, पोकॉ रमेश सुर्यवंशी, पोकॉ.भाऊसाहेब राठोड, पोकॉ. मेघराज पुरी हे मोबाईल चोरट्यांचा शोध घेण्यासाठी मंगळवार दि. ४ जून रोजी गस्तीवर असताना चौधरी पेट्रोलपंपाच्या बाजुस चोरीचे मोबाईल विक्री करत असताना त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याच्याकडे चोरीचे १३ मोबाईल आढळून आले. ते जप्त करून पोलिसांनी त्यास अटक केली आहे.